अतित्वर्य / महत्वाचे
फक्त नांव समितीच्या मा. सभासदांसाठी

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दिनांक – ५/६/२०१८

**<u>–: परिपत्र : –</u>**

**विषय –** नांव समितीच्या **मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष** यांची निवडणूक.

महाराष्ट्र (मुं.प्रां.) मनपा (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती व इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ , सुधारीत नियम २००८ व २०१० मधील नियम २(२) व ४ अन्वये **मा. अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष** नांव समिती यांची निवडणूक मा.विभागीय़ आयुक्त,पुणे विभाग यांचे आदेशानुसार **बुधवार दिनांक १३/६/२०१८ रोजी सकाळी ११:३०** (साडे अकरा ) **वाजता** भरणाऱ्या नांव समितीच्या सभेत होईल. सदर बैठकीचे वेळी पीठासीन अधिकारी म्हणून मा.विभागीय़ आयुक्त , पुणे विभाग यांनी **मा.सुशील खोडवेकर, प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे** यांची नेमणूक केली आहे.

तरी **मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष** नांव समिती या पदासाठी नांव समितीच्या ज्या मा. सभासदांना उभे रहावयाचे असेल त्यांनी छापील नमुन्यांमध्ये आपले नामनिर्देशन पत्र ( नॉमिनेशन पेपर ) रितसर भरून ते नगरसचिव यांचेकडे द्यावे. नामनिर्देशन पत्राचे छापील नमुने ( फॉर्म्स ) नगरसचिव कार्यालयात कार्यालयाचे वेळेत मिळतील.

<u>नामनिर्देशित पत्र स्विकारण्याचा दिवस शुक्रवार, दि. ८/६/२०१८ रोजी वेळ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० असा निश्चित करण्यात आला आहे.</u>

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

( टिप – प्रस्तुत सभेची कार्यपत्रिका वेगळी पाठविण्यात येत आहे. )